दिशादर्शक, मार्गदर्शक!

# दिवा न्यूज

वर्ष-३ ▪ अंक-३ www.diwanews.com RNI No.-MAHMAR/2021/80669

▪ epaper.diwanews.com ▪ सोमवार, २१ ऑगस्ट २०२३ ▪ पाने ८ ▪ ₹ ४ रु.




*सद्गुरूंमुळेच घडलो मी...*
*सद्गुरुं पुढे नतमस्तक मी...*
*मी जो काही आज आहे,*
*तो माझ्या सद्गुरुं मुळेच!*

(सविस्तर पान ४ व ५ वर)

## शैलेश पाटील... राजकारणा पलीकडे माणुसकी जपणारा भला माणूस!

सुहास खंडागळे

गेली १२ वर्षे मी शैलेश पाटील यांचे राजकारण जवळून पाहतोय... त्यांची काम करण्याची पध्दत,बघतो..करतो...सांगतो अशी नाही...जेव्हा दिवा शहर हाच एक प्रभाग होता आणि या प्रभागात फक्त दोन नगरसेवक होते तेव्हा पार खिडकली पर्यंत शैलेश पाटील यांच्या कामाचा आवाका मी पाहिला आहे.ज्या गोष्टी नगरसेवक पदाच्या कक्षेत येत नाहीत त्या देखील सोडविण्याचा अनेकदा त्यांनी केलेला प्रयत्न,धडपड पाहिली आहे....निधी नाही,फाईल मंजूर नाही...प्रस्ताव नाही...साहेबांना सांगून बघतो...हे असले शब्द शैलेश पाटील यांच्या डिक्शनरी मध्ये नाहीत.

जे काम जाग्यावर होणे शक्य आहे,त्यासाठी येणारा खर्च भलेही स्वतः च्या खिशातून करावा लागला तरी करायचा आणि ते काम करायचं ही त्यांची भूमिका तेव्हापासून आज पर्यंत तशीच आहे.काहीजण या पद्धतीवर टीका करतील,पण शैलेश पाटील असेच आहेत.

त्यांची एक विशेष बाब म्हणजे ते दिखावा करत नाहीत,जसे आहेत तसे लोकांसमोर जातात.लोकांना चांगलं वाटावं म्हणून खोटं आश्वासन देत नाहीत... काम होईल की नाही हे स्पष्ट पणे सांगतात...आपल्या परीने काय करता येईल हेही सांगतात...ऑफिस मध्ये समस्या घेऊन येणाऱ्यांना जास्त फेऱ्या मारायला लागू नयेत याची काळजी शैलेश पाटील घेतात.एक गोष्ट येथे नमूद करावीशी वाटते, शैलेश पाटील यांच्या कार्यालयात दिव्या बाहेरील गरीब गरजू लोकं मदतीसाठी येतात,शैक्षणिक, आर्थिक,आरोग्य अशा अनेक प्रकारची मदत गोरगरिबांना करताना शैलेश पाटील जात,धर्म बघत नाहीत. हे सांगण्याचे कारण, आजकाल जे राजकारण उच्च भ्रू लोकांकडे गेले आहे तिथे गरिबी आणि गरिबांची जाण शैलेश पाटील ठेवताना दिसतात.मागील १० वर्षांच्या राजकिय जीवनात त्यांनी अनेक लोकं जोडली,अनेकांची कामे केली.विरोधकांची टीकाही सहन केली...पण दिवा शहरासाठी शैलेश पाटील यांच्यासारखा लोकप्रतिनिधी हवा...हा विश्वास त्यांनी त्यांना मानणाऱ्या वर्गात निर्माण केला ही त्यांच्या कामाची पोचपावती आहे.

आपल्या जवळचा कार्यकर्ता असो अथवा एखादा सामान्य माणूस वैद्यकीय उपचारासाठी मदत मागायला आला तर त्याला मदत करण्याची भूमिका शैलेश पाटील घेतात.आमचे एक मित्र होते,चव्हाण काका.शैलेश पाटलांवर त्यांचे विशेष प्रेम...कोकणात रेल्वे गाड्या वाढल्या पाहिजेत यासाठी पाटील यांच्याकडे ते पत्रव्यवहार साठी सतत पाठपुरावा करायचे..ते जेव्हा यायचे तेव्हा काही वेळा मीही उपस्थित असायचो...एकदा शैलेश पाटील यांना ते गंभीर आजारी असल्याचे कळाले, मीही तिथे होतो.चव्हाण काका परिचयाचे असल्याने मी शैलेश पाटील यांच्यासोबत हॉस्पिटलमध्ये गेलो.

(पान ६ वर)

# श्री सेवक...लोकसेवक!

## दिवेकारांना आपलासे वाटणारे शैलेश पाटील!

संपूर्ण अंक आवर्जून वाचा!




## नियमित आयोजित केली जाणारी आरोग्य शिबिरे

शैलेश पाटील यांच्या वतीने शहरात वेळोवेळी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात येतात. यामध्ये शेकडो नागरिक त्या शिबिरांचा लाभ घेत असतात. नागरिकांचे आरोग्य उत्तम रहावे व नागरिकांना परवडणारे उपचार मिळावेत यासाठी ही शिबीर राबवली जातात.



नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे कोकणरत्न परिसरात काही विभागात पाणी भरले होते. त्यामुळे त्या परीसरातील लोकांना त्रास सहन करावा लागला. नागरिकांची गैरसोय लक्षात घेऊन महापालिका कर्मचाऱ्यांना शैलेश पाटील स्वत: स्पॉटवर गेले...शहराचा विस्तार मोठा आहे.त्यामुळे जेव्हा जी समस्या समोर येते शैलेश पाटील ती समस्या सोडविण्याचा प्रामाणिक प्रयत्न करतात!



## नागरिकांच्या मदतीसाठी तत्परता!



एकविरा आई अपार्टमेंट येथे भरलेले पाणी काढण्यासाठी दिवा प्रभाग समिती आपत्कालीन विभागाने डिझेल मोटारची व्यवस्था केली.शैलेश पाटील यांच्या सूचनेनुसार तातडीने पालिकेने पावले उचलली.जिथे नागरिकांना तातडीने दिलासा देणे गरजेचे आहे तिथे शैलेश पाटील यांची भूमिका ही लोकांच्या बाजूने असते.वेळप्रसंगी स्वत:च्या खर्चाने नागरी कामे पाटील करत असतात.



## महिलांसाठी स्वयंरोजगाराचे प्रशिक्षण

शैलेश मनोहर पाटील यांच्या पुढाकाराने दिवा शहरात महिलांना स्वयंरोजगार चे प्रशिक्षण दिले जाते.या अंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी विविध कोर्सेस राबविण्यात येतात. यामध्ये ४ जुलै २०२३ रोजी महिलांसाठी १ दिवसाचे मोफत मेकअप प्रशिक्षण ग्रुमिंग क्लासेस ब्युटी पार्लर मार्फत देण्यात आले. एन.आर. नगर शिवसेना शाखा दिवा पश्चिम येथे हे शिबिर पार पडले.

## गरजू मुलांसाठी मोफत क्लासेस

शैलेश मनोहर पाटील यांच्या पुढाकाराने जिजाऊ शैक्षणिक संस्था यांच्या वतीने दिवा पश्चिम येथे गरजु मुलांसाठी मोफत कोचिंग क्लासेस व इंग्लिश स्पिकींग कोर्स चालु करण्यात आले.याशिवाय महिलांसाठी नर्सिंग कोर्स चालु आहेत.




**संपादक**
सुहास खंडागळे
**व्यवस्थापक**
सौ. अरुणा किरण जाधव
मो. ९९८७५१२००१
**छायाचित्रकार/प्रतिनिधी**
सुदेश सकपाळ
**वितरण प्रतिनिधी**
संतोष मदने
**ऑफिस पत्ता :-**
गाळा नं. ०६, आई जीवदानी कॉम्प्लेक्स, हरिशश्चंद्र अपार्टमेंटच्या मागे,वारेकर शाळेजवळ, गुरुदर्शन नगर, मुंब्रादेवी कॉलनी रोड, दिवा (पूर्व), ठाणे-४००६१२.


## नियमित आयोजित होणारी डोळे तपासणी शिबिरे







शैलेश मनोहर पाटील यांच्या मार्फत रिलायन्स टॉवर शिवसेना शाखा येथे मोफत कॉम्प्युटर द्वारे डोळे तपासणी व अल्प दरात चश्मे वाटप शिबिरचे आयोजन करण्यात आले.असे उपक्रम पाटील यांच्या माध्यमातून नियमित राबविण्यात येत असतात.

## महिलांसाठी मेहंदी क्लासेस

शैलेश मनोहर पाटील यांच्या पुढाकाराने जिजाऊ शैक्षणिक संस्था आणि दिवा माहेर सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने महिलांसाठी विनामूल्य विविध कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत.या अंतर्गत मेहंदी क्लासेस यशस्वीरित्या सुरू आहेत.एन आर नगर व क्रिश कॉलनी येथील महिलांचा या क्लासेसला अतिशय उत्तम प्रसिद्ध प्रतिसाद मिळाला!



## शैलेश पाटील यांनी दिवा आरोग्य केंद्रास ५५ इंच अँड्रॉइड टीव्ही सप्रेम भेट





हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक आणि संपादक सुहास शांताराम खंडागळे यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया आणि पब्लीकेशन प्रा. लि. प्लॉट क्र. डब्ल्यू २३०, टीटीसी खैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून, श्रीकृपा बिल्डींग, ए-विंग, पहिला माळा, फ्लॅट क्रमांक १०१, सेंट मेरी शाळेजवळ, दिवा (पूर्व), ठाणे-६१२ ता/जि-ठाणे राज्य-महाराष्ट्र येथून प्रकाशित केले. संपर्क-८०८०९७७९५५

**संपादक-सुहास शांताराम खंडागळे RNI No.-MAHMAR/2021/80669**


श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील


लोकनेते,लोकसेवक
शैलेश मनोहर पाटील
◆ रस्ते विकास,पायवाटा, पदपथ दिवे
◆ पाणी समस्या सुटण्यासाठी नव्या पाणीलाईनसाठी पाठपुरावा..
◆ डम्पिंग ग्राउंड हटविण्यासाठी संघर्ष!
दिवा शहराच्या विकासासाठी अविरत संघर्ष!
सामान्य जनतेच्या समस्यां सोडविण्याचा संकल्प!
गरीब-सामान्य जनतेची जाण असणारा नेता
दिव्याचे लोकप्रिय नेते
शैलेश पाटील
यांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक:- कैलेश पाटील,समाजसेवक

श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील



# सद्गुरुंमुळेच घडलो मी... सद्गुरुं पुढे नतमस्तक मी...

## माजी नगरसेवक शैलेश पाटील

### यांनी मुलाखती दरम्यान व्यक्त केली भावना



**प्रामाणिकपणे लोकसेवा करतानाही आपल्यावरच जेव्हा जिव्हारी लागणारी टीका होते...तेव्हा वाईट वाटतं.. हे राजकारण नकोस वाटतं. राजकारण सोडावसं वाटतं...–शैलेश पाटील यांनी व्यक्त केली खंत**

**माजी नगरसेवक व शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांनी विशेष अंकासाठी प्रदीर्घ मुलाखत दिली.या मुलाखतीत त्यांनी मनमोकळ्या गप्पा मारल्या.विकासकामे,राजकारण यासह अनेक मुद्द्यावर त्यांनी रोखठोक भाष्य केले.लोकांचे प्रेम आपल्याला मिळाले याचे समाधान व्यक्त करताना काही विरोधक बनावट नावाने फक्त आपल्यावर जाणीवपूर्वक टीका करतात अशी खंतही त्यांनी व्यक्त केली...**

**सुहास खंडागळे यांनी घेतलेली त्यांची मुलाखत प्रसिद्ध करत आहोत!**

**▶ प्रश्न: – दहा वर्ष राजकारणात आहात...मागच्या दहा वर्षाचा अनुभव कसा आहे?**

**शैलेश पाटील:–** चांगला आहे आणि वाईट ही आहे...चांगला या दृष्टीने की मला नगरसेवक दहा वर्षे पद मिळाल्याने मी लोकांची सेवा करू शकलो. त्याआधीही मी समाजसेवा करत होतो, मात्र काही मर्यादा होत्या. शासनाच्या माध्यमातून दिवा शहराला प्रामाणिकपणे न्याय द्यायचा प्रयत्न मी केला. पहिली पाच वर्ष संपूर्ण दिवा शहराचा नगरसेवक असताना अनेक संकट,अनेक आव्हान..संघर्ष करावा लागला होता. आता जे आठ नगरसेवक आहेत त्या आठ नगरसेवकांचे काम जवळपास एकट्याला त्यावेळी कराव लागत होतं.

**▶ प्रश्न:– एरिया खूप मोठा होता....**

**शैलेश पाटील:–** हो...संपूर्ण दिवा शहरातील लोक त्यावेळी समस्या घेऊन यायचे...पर्याय नव्हता. त्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडवण्यासाठी मी प्रामाणिक प्रयत्न करायचो. आजही माझ्या प्रभागात नसलेली लोक माझ्यावर जिवापाड प्रेम करतात..हे त्यावेळेला मी केलेल्या कामाची पोच पावती आहे. काहीजण टीका करायची म्हणून प्रश्न विचारतात काय काम केलं?मी ज्यांच्यासाठी काम करतो किंवा केलं आहे त्यांना माझ्या कामाची जाणीव आहे.

**▶ प्रश्न:–आता दिवा बदलताना दिसतोय...तुम्ही ज्या ज्या मागण्या केल्यात,आवाज उठवला ते प्रश्न सुटताना दिसतायत...**

**शैलेश पाटील:–** जे प्रश्न मी पहिल्यांदा नगरसेवक असताना आक्रमक पणे मांडले ते मागील पाच वर्षात सुटण्यास सुरवात झाली ही वस्तुस्थिती आहे. मागील पाच वर्षात विकास काम जोमाने झाली.मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या आशीर्वादाने व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा शहर बदलत आहे.निधीची कमतरता नाही... रस्ते, पायवाटा मागील पाच वर्षात झाल्या.नगरसेवक म्हणून विकास काम होत असल्याचा आनंद आहे. जनतेचे प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटतायेत, याचं समाधान आहे!

**▶ प्रश्न:–मग वाईट कसलं वाटतंय..?**

**शैलेश पाटील:–** वाईट या गोष्टीचे वाटतं की काम करूनही काही वेळा विनाकारण टीका सहन करावी लागते.जाणीवपूर्वक मलाच टार्गेट केलं जातं का असा प्रश्न पडतो...माझ्याही काही मर्यादा आहेत.आज घरी जायची माझी वेळ निश्चित नसते. रात्री दहा अकरा वाजेपर्यंत लोक भेटायला येत असतात. दुपारी जेवणाची वेळ नसते. शहरातील अन्य नगरसेवकांना लोक किती भेटतात हे मला माहित नाही... परंतु माझ्या ऑफिसमध्ये आलेले लोक कधी रिकामी हाताने परत जात नाहीत. लोकांचे प्रश्न सोडवण्याचा मी प्रामाणिक प्रयत्न करतो. त्यांच्या समस्या ऐकून घेतो.काहीतरी तोडगा काढण्याचा माझ्याकडून प्रयत्न होतो. आणि म्हणून कदाचित दिवा शहरातील लोक आजही माझ्यावर सर्वाधिक प्रेम करतात.शैलेश पाटील कडे आपण गेलो तर आपल्याला न्याय मिळेल ही भूमिका लोकांच्या मनामध्ये आहे! याचा मला आनंद आहे. समाधान आहे.राजकारणात येऊन दहा वर्षात जनतेचे प्रेम मी कमावलं याचा आनंद मला आहे...

**▶ प्रश्न:– ही मुलाखत घेत असताना तुमचे कार्यकर्ते लोक तुम्हाला भेटायला येतायत...मी हे पाहतोय... नगरसेवक नसतानाही तुम्ही लोकांची काम तितक्याच तत्परतेने करत आहात...**

**शैलेश पाटील:–** मला आता या गोष्टींची सवय झाली. लोकांना माझी सवय झाली. त्यामुळे मी नगरसेवक असलो काय,नसलो काय.. मी जनतेसाठी काम करणारा कार्यकर्ता आहे! लोकांच्या मदतीला अडचणीला धावून जाणं हे माझं मी कर्तव्य समजतो.

**▶ प्रश्न:– तुम्ही मगाशी म्हणालात की थोडसं वाईटही वाटतं...नेमकं काय मनामध्ये आहे?**

**शैलेश पाटील:–** एकीकडे समाजसेवेचे वेड हे पहिल्यापासूनच आहे. माझ्या आजोबांकडून मला राजकारणाचे धडे मिळाले. माझे आजोबा हरिश्चंद्र पाटील उपसरपंच होते. लोकसेवा करण्याचा मार्ग मला माझे गुरु आणि बैठकीतून मिळाला. मी राजकारणात कधीही स्वार्थ पाहिला नाही... पाहणार नाही! लोकसेवा हाच माझा धर्म राहिला आहे.मात्र प्रामाणिकपणे लोकसेवा करतानाही आपल्यावरच जेव्हा जिव्हारी लागणारी टीका होते...तेव्हा हे राजकारण नकोस वाटतं. राजकारण सोडावसं वाटतं. तुम्हाला खरं सांगतो कधी कधी या राजकारणाचा खूप कंटाळा येतो. राजकारण नको वाटतं.परंतु लोकांचे प्रेम आणि लोकांच्या समस्या या सोडवण्याची जबाबदारी माझ्यावर असल्याने ती जबाबदारी समजून मी हे सगळं दुःख बाजूला ठेवतो आणि पुन्हा लोकांमध्ये लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी मिसळतो. माझ्या सद्गुरूंनीच मला ही ताकद दिली आहे.

### दिवा बदलतोय...

- मागील पाच वर्षात दिवा शहर बदलतेय,शहराचा विकास होतोय...
- ठाण्यात ज्या सुविधा नागरिकांना मिळतात त्या दिव्यातील नागरिकांनाही मिळाल्या पाहिजेत यासाठी प्रयत्न सुरू राहणार!
- मी राजकारणात कधीही स्वार्थ पाहिला नाही... पाहणार नाही! लोकसेवा हाच माझा धर्म राहिला आहे
- मागील पाच वर्षात विकास काम जोमाने झाली.मुख्यमंत्री शिंदे साहेबांच्या आशीर्वादाने व खासदार श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली दिवा शहर बदलत आहे.
- दिवा पश्चिमेला असणाऱ्या महापालिकेच्या मराठी शाळेत दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार...
- मुंब्रादेवी कॉलनीचा पाणी प्रश्न लवकरच सुटेल,नवीन पाईपलाईन सुरू केली जाईल असे माजी उपमहापौर रमाकांत मढवी यांनी मला सांगितले आहे..त्यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे..

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
www.diwanews.com
सोमवार, दि. २१ ऑगस्ट २०२३ पान : ५

श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील



# दिवा पश्चिमेला असणाऱ्या महापालिकेच्या मराठी शाळेत दर्जेदार शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी आगामी काळात प्रयत्न करणार...

**▶ प्रश्न:– तुमच्या जीवनात तुमच्या गुरूंचे खूप मोठे योगदान आहे.. काय सांगाल..**

**शैलेश पाटील:–** सद्गुरूंमुळेच घडलो मी... सद्गुरु पुढे नतमस्तक मी... यापुढे मी आपणास काय सांगू.. मी जो काही आज आहे तो माझ्या सद्गुरू मुळे आहे! त्यांनीच मला मार्ग दाखवला आहे आणि त्यांनी दाखवलेल्या मार्गावरच मी आयुष्यभर चालणार आहे. लोकसेवा मानव सेवा हाच खरा धर्म ही त्यांची शिकवण आम्ही जोपासली आहे!

**▶ प्रश्न:– दिवा शहरात विकासकामे होताहेत..अजून काय बदल व्हावा अशी तुमची भूमिका आहे?**

**शैलेश पाटील:–** पायाभूत सुविधा दिवा शहरातील नागरिकांना पुरवण्यात काही प्रमाणात आम्ही यशस्वी झालो आहोत.पायवाटा रस्त्यांचा प्रश्न तर जवळपास निकालात निघाला आहे. आता येणाऱ्या काळामध्ये पाणी प्रश्न ही कायमचा सुटेल. दिव्यात रस्ते, गटारे ही काम होत आहेत. पण याचबरोबर गार्डन,मैदान, नाना–नानी पार्क ठाणे महापालिकेची एखादी सुसज्ज व्यायामशाळा, शहर सुशोभीकरण,दिवा पश्चिमेला असणारी एकमेव मराठी शाळा जी ठाणे महापालिकेची सर्वाधिक पटसंख्या असणारी शाळा आहे. ही शाळा दहावीपर्यंत व्हावी आणि अत्याधुनिक शैक्षणिक सुविधा या शाळांमध्ये उपलब्ध व्हाव्यात ही माझी मनापासून इच्छा आहे. आमच्या परिस्थितीमुळे आम्ही त्यावेळी शिक्षण घेऊ शकलो नाही. मात्र आजच्या पिढीला महापालिकांच्या शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी माझा प्रयत्न सुरू आहे.पाठपुरावा सुरू आहे. दिवा पश्चिमेला या शाळेत दर्जेदार शिक्षण मुलांना उपलब्ध व्हावं अशी माझी भूमिका आहे.

**▶ प्रश्न:– २०१२ पासून दिवा पश्चिमेला रेल्वे रुळाखाळून पुश थ्रू पद्धतीने पाईपलाईन टाकण्यासाठीचा तुमचा पाठपुरावा सुरू होता.. आता याला यश येतंय...काय सांगाल?**

**शैलेश पाटील:–** हो याबद्दल खरच मला आनंद झाला आहे.. रेल्वे रुळाखालून पाईपलाईन टाकण्यासाठीचा पाठपुरावा गेली दहा वर्षे आम्ही करतोय.अतिशय तांत्रिकदृष्ट्या अडचणीचा असणारा हा मुद्दा खासदार श्रीकांत शिंदे यांच्यामुळे निकालात निघतोय यासाठी संपूर्ण दिवावासीयांच्या वतीने मी त्यांचा आभारी आहे. गेली दहा वर्षे आम्ही प्रामाणिकपणे रेल्वे रुळाकडून पुश थ्रू पद्धतीने पाईपलाईन टाकण्याचा पाठपुरावा केला आणि त्याला आता अंतिम टप्प्यात यश येतंय याचा मला विशेष आनंद आहे...दिवा गावातील जनतेच्या पाठपुराव्याचे हे यश आहे.

**▶ प्रश्न:– तुम्ही मगाशी राजकारणाचा कंटाळा आलाय असा उल्लेख केला... काही राजकीय विरोधकांकडून तुमच्या बदनामीचा प्रयत्न सुरू आहे...त्यामुळे तुम्ही व्यथित आहात?**

**शैलेश पाटील:–** आजकालचं राजकारण विचित्र आहे. काही वेळा काम करून सुद्धा काम करणाऱ्याला टार्गेट केलं जातं.हे जाणीवपूर्वक होतं असं माझं मत आहे. आपलेच लोक असं करतात असं कधी कधी वाटतं आणि यातून या सगळ्याची उबक येऊन संताप येतो.आणि मग या घाणेरड्या राजकारणाचा कंटाळा येतो...मी जो राजकारणात आहे तो धंदा म्हणून नाही..एक लोकसेवा म्हणून मी राजकारणात आहे...आपली बदनामी नेमकी का होते.. आपण असं कुणाचं काय घोडं मारलाय असा प्रश्न पडतो. मध्यंतरी फेसबुक आणि इंस्टाग्राम वरून बदनामीचा प्रयत्न झाला.फेसबुकवर बनावट अकाउंट काढून मलाच टार्गेट केलं गेलं. इंस्टाग्रामच बोगस अकाउंट काढून टार्गेट करण्याचा प्रयत्न होता. किती वेळा पोलीस तक्रारी करत बसायचं? बरं ज्यांना राजकारणात मला हरवायचं आहे त्यांनी मैदानात येऊन माझ्याशी लढावं.असा छुप्या पद्धतीने हल्ला करून त्यांना यश मिळणार नाही, कारण दिवा शहरातील जनतेचे प्रेम माझ्या बरोबर आहे!




**▶ प्रश्न:– मुंब्रा देवी कॉलनीचा पाण्याचा प्रश्न कधी सुटणार असा प्रश्न नागरिक वारंवार विचारतात... काय सांगाल?**

**शैलेश पाटील:–** या प्रश्नावर माजी उपमहापौर, शहर प्रमुख रमाकांत मढवी यांच्याशी चर्चा झाली आहे. लवकरच ही पाण्याची लाईन सुरु केली जाईल असं त्यांनी सांगितलेलं आहे.आता तांत्रिक बाबी पूर्ण झाल्या की मुंब्रा देवी कॉलनीची पाण्याची लाईन सुरु होईल.मुंब्रा देवी कॉलनीचा पाण्याचा प्रश्न कायमचा सुटेल आणि हा प्रश्न जोपर्यंत सुटत नाही, तोपर्यंत मी गप्प बसणार नाही.तुम्हाला एक गंमत सांगतो मी २०१२ ते १७ या काळात संपूर्ण दिवा शहराचा नगरसेवक राहिल्याने,आजही पार गणेश नगर पासून आगासन या भागातले लोक सुद्धा अनेक प्रश्न घेऊन माझ्याकडे येतात.मी त्यांना निराश करत नाही.लोक आस्थेने येतात. त्यामुळे त्यांच्या समस्या समजून घेतो आणि योग्य त्या माणसाकडे त्यांना जाण्याचा सल्ला देतो. काही प्रश्न माझ्या पातळीवर सुटत असतील तर ते मी प्रामाणिकपणे सोडवतो.

**▶ प्रश्न:– आज दिवा स्टेशन परिसरातील अनेक समस्या सुटताना दिसत आहेत... तुम्ही वेळोवेळी २०१२ ते १७ या काळात या संदर्भात आंदोलन केली..अगदी आत्मदहनाचा इशाराही दिला...आज परिस्थिती बदलताना दिसते...**

**शैलेश पाटील:–** दिव्या जो बदल घडतोय तो सहज घडत नाही.. यासाठी दिवा वासियांचा संघर्ष आहे.मी दिवा वासियांच्या समस्या सुटाव्यात यासाठी २०१२ ते १७ या काळात जनतेला सोबत घेऊन संघर्ष केला. दिव्यातील अनेक नेत्यांनी संघर्ष केला आज त्याचा परिणाम म्हणून येथे सुविधा उपलब्ध होत आहेत. खासदार श्रीकांत शिंदे यांनी पाठपुरावा केला.त्यांनी या समस्या समजून घेतल्या आणि दिवा शहराचं दिवा स्टेशनचं स्वरूप बदललं याचे मला समाधान आहे..आनंद आहे! गेल्या दहा वर्षांमध्ये रस्ते गटारे पायवाटा त्याचबरोबर अनेकांना पाण्याच्या लाईन अशी अनेक कामे केली. मात्र त्याचबरोबर सर्वसामान्य माणसाचे जीवन सुखकर होण्यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न केला...लोकांच्या वैयक्तिक अडीअडचणी सोडविण्याची मला संधी मिळाली... मी हे माझे भाग्य समजतो!..माझ्यावर प्रेम करणाऱ्या जनतेचे मी आभार मानतो...

**धन्यवाद!**



श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील



# अनेकांना व्यावसायिक घडविणारे नेतृत्व...

लोकप्रतिनिधी स्वतःच्या पिढ्या मजबूत करत असल्याच्या अनेक कथा आपण ऐकतो, मात्र शैलेश पाटलांना हा नियम लागू होत नाही. दिवा शहरात अनेक उद्योजक, व्यावसायिक घडवण्याचं काम शैलेश पाटील यांनी केले आहे. अनेकांना त्यांच्या वेगवेगळ्या व्यवसायामध्ये मुदत करून स्वतःच्या पायावर उभं करण्यासाठी शैलेश पाटील यांची धडपड पाहायला मिळते.मराठी माणसाने धंद्यात उतरले पाहिजे असं बोलून ते थांबत नाहीत तर अनेकांना व्यवसाय सुरू करण्यास त्यांनी प्रोत्साहन त्यांनी दिले आहे.

आज शेकडो लोकांना स्वतःच्या पायावर.. एखाद्या व्यवसायामध्ये, धंद्यामध्ये उभे करून, त्यांना इतरांना रोजगार देण्या इतपत मजबूत करण्याचं काम शैलेश पाटील यांनी केले आहे. शैलेश पाटील यांनी कधीच स्वतःचाच फायदा झाला पाहिजे या भूमिकेतून काम केलेले नाही. गेली दहा वर्ष नगरसेवक असताना सोबतच्या लोकांसाठी आपण काय करू शकतो,त्यांना काय सहकार्य करू शकतो अशी भूमिका शैलेश पाटील यांनी घेतलेली पहायला मिळते.

एखादा आपल्या जवळचा व्यक्ती छोटा-मोठा उद्योग सुरू करतोय आणि त्याला भांडवलाची कमतरता असेल तर भांडवल उपलब्ध करून देण्याची देखील भूमिका अनेक वेळा शैलेश पाटील यांनी घेतलेली आहे.त्यामुळे शैलेश पाटील यांनी स्वतःची प्रगती करताना आपल्या बरोबरच्या लोकांची प्रगती कशी होईल याकडे देखील कटाक्षाने लक्ष दिलेलं पाहायला मिळते. म्हणूनच आज त्यांच्यासाठी असंख्य लोक उभे राहताना पाहायला मिळतात...दिवा शहरात तरुणांना प्रोत्साहन देणारा शैलेश पाटील हे नेतृत्व आहे!

**- विनायक निंबाळकर**



# शैलेश पाटील यांनी घडवले दिव्यातील हजारो नागरिकांना देवी एकविरा आईचे दर्शन!

**सामान्य जनतेला एकाचवेळी आनंदाने मोफत देवदर्शन घडवावे या भावनेतून दिवा शहरातील पाच हजार नागरिकांना शैलेश पाटील यांनी देवी एकविरा आईचे दर्शन घडवले तो क्षण अनेकांनी डोळ्यात साठवून ठेवला.अदभूत असा सोहळा होता तो.. अनेक दिवसांची माझी इच्छा एकविरा आईने पूर्ण केली असे शैलेश पाटील त्यावेळी म्हणाले!**

सामान्य जनतेला एकाचवेळी आनंदाने मोफत देवदर्शन घडवावे ही अनेक दिवसांची माझी इच्छा एकविरा आईने पूर्ण केली हे सांगताना देवी एकविरा आईच्या चरणी असणारी भक्ती शैलेश पाटील यांच्या चेहऱ्यावर दिसत होती. दिव्यातील पाच हजारहून अधिक महिला,पुरुष,लहान मुलं या सर्वांनी आनंदाने आणि भक्ती भावने एकविरा आईचे दर्शन घेतले अशी भावना एकविरा आई देव दर्शन सोहळ्याचे आयोजक शैलेश पाटील यांनी त्यावेळी व्यक्त केली.





मार्च महिन्यात दिव्यातील हजारो नागरिकांनी एकाच वेळी आई एकविरा देवीचे दर्शन घेतले. माजी नगरसेवक व शिवसेना उपशहर प्रमुख शैलेश पाटील यांनी हा उपक्रम आयोजित केला होता.

दिवा शहरातील सर्व सामान्य नागरिकांना मोफत देवदर्शन सामूहिक पध्दतीने घेता यावे,नागरिकांमध्ये बंधुभाव वाढवा या हेतूने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

दिव्यातून सर्व देवी भक्तांना आई एकविरा देवीच्या दर्शनासाठी १०८ विशेष बससेसची व्यवस्था करण्यात आली होती.हा संपूर्ण देवदर्शन सोहळा नागरिकांना मोफत होता.शैलेश पाटील आयोजित देवी एकविरा आई दर्शन सोहळ्यात दिव्यातील सुमारे पाच हजार हुन अधिक नागरिक सहभागी झाले होते. इतक्या मोठ्या प्रमाणात दिव्यातून देवदर्शन साठी सामूहिक रित्या नागरिक जाण्याचा हा पहिलाच उपक्रम असल्याचे आयोजकांनी सांगितले.

राजकारणा पलीकडे समाजसेवेचे व्रत म्हणून देवदर्शन सोहळ्याचे आयोजन केल्याचे शैलेश पाटील म्हणाले.

माजी नगरसेवक शैलेश पाटील हे विविध उपक्रम राबवून दिवा शहरातील जनतेला दिलासा देण्याचे काम करत असतात.राजकारणा पलीकडे समाजसेवेचे व्रत जपण्याचे काम शैलेश पाटील करत असतात. कोरोना काळात मोफत लसीकरण चा उपक्रम देखील शैलेश पाटील यांनी दिव्यात पहिल्यांदा आयोजित केला होता.सामान्य दिवेकरांच्या जीवनात आनंद मिळावा यासाठी शहरातील हजारो नागरिकांना एकाच वेळी देवी एकविरा आई दर्शन घडविण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

●●●

## शैलेश पाटील... राजकारणा पलीकडे माणुसकी जपणारा भला माणूस!

(पान १ वरून)

ते हॉस्पिटलमध्ये केवळ चव्हाण काकांना बघायला नव्हते गेले तर उपचाराचा खर्च जास्त असल्याचे कळल्याने स्वतःहून एक लाखांची मदत घेऊन शैलेश पाटील हॉस्पिटलमध्ये गेले होते. हे तिथे गेल्यानंतर मला कळालं...चव्हाण काकांना बेडवर पाहून शैलेश पाटील यांच्या डोळ्यात अश्रू मी त्यावेळेस पाहिले...राजकारणात फार कमी लोकं असे असतात ज्यांना दुसऱ्यांच्या कुटुंबाची काळजी असते...शैलेश पाटील त्यापैकी एक आहेत. राजकारणात आरोप प्रत्यारोप होत असतात. विकास कामांवरून टीका टिप्पणी होत असते...शेवटी जनतेच्या मनात ज्याला स्थान असतं त्याला टीकात्मक राजकारणाचा फारसा फरक पडत नाही.नगरसेवक पदाचे उमेदवार हे लोकांशी किती जोडले गेले आहेत यावर त्यांचं अस्तित्व अवलंबून असते.शैलेश पाटील यांच्या बाबतीत हीच गोष्ट फार जमेची आहे. राजकारणा पलीकडे त्यांनी माणूस म्हणून जे काम दिवा शहराच्या जनमानसात केलं आहे त्यातून त्यांनी असंख्य लोकांची मने जिंकली आहेत हे सत्य नाकारता येणार नाही.त्यांची हीच ताकद आहे.शैलेश पाटील यांच्या सोबत असणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांनी ही गोष्ट विशेष लक्षात घ्यायला हवी.माणसं जोडली गेली आहेत,यामागे शैलेश पाटील यांच्या कामाची प्रचंड मेहनत आहे...ही माणसं आपल्या कोणत्याही कृतीतून तुटणार नाहीत याची काळजी विशेषतः जवळच्या लोकांनी घ्यायला हवी...येणाऱ्या काळात शैलेश पाटील यांना उज्वल राजकीय भवितव्य लाभो ही सदिच्छा! दीर्घायुष्य लाभो...त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २१ ऑगस्ट २०२३


श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील




# वारकऱ्यांच्या सेवेत मला विठोबा दिसतो...
## शैलेश पाटील यांच्यातर्फे दरवर्षी वारी दरम्यान ॲम्ब्युलन्स सेवा



शैलेश पाटील हे राजकारणी असले तरी त्यांची अध्यात्माची नाळ जोडलेली आहे! धार्मिकता आणि अध्यात्माशी ते कायम जोडलेले पाहायला मिळतात. हिंदू सण उत्सव मोठ्या उत्साहात साजरे करण्याबरोबरच सेवाभाव जपण्याकडे शैलेश पाटील यांचा अधिक कल असतो. देव माणसात आहे. ही शिकवण घेऊन चालणारे शैलेश पाटील सर्वसामान्यांची सेवा करण्यात धन्यता मानतात. दरवर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांची आरोग्याची काळजी घेण्यासाठी एक ॲम्बुलन्स आणि ड्रायव्हर किमान महिनाभर शैलेश पाटील वारकऱ्यांच्या सेवेत देतात. आपल्या वारकरी बंधूंना छोटसं सहकार्य करावे या भूमिकेतून त्यांचे हे काम अविरतपणे सुरू आहे. याचा कोणताही गाजावाजा शैलेश पाटील करत नाहीत. वारकऱ्यांच्या सेवेतच आपल्याला विठोबा दिसतो असं शैलेश पाटील आवर्जून सांगतात.विठ्ठलाच्या भेटीसाठी महिनाभर चालत जाणाऱ्या वारकऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांची आरोग्याची काळजी घेण्यासाठी आपण काय करू शकतो या भावनेतून ॲम्बुलन्स उपलब्ध करून देण्याचा उपक्रम ते राबवत असल्याचे शैलेश पाटील यांचे सहकारी आणि या वारीमध्ये ॲम्बुलन्स घेऊन दरवर्षी न चुकता दाखल होणारे बिभीषण गायकवाड सांगतात. बिभीषण गायकवाड शैलेश पाटील यांच्या बद्दल सांगताना म्हणतात की, सर्व धर्मीयांची आध्यात्मिक शक्ती स्थाने जपण्याची शैलेश पाटील यांची भूमिका असते! ते कधीच कोणत्याही धर्माच्या व्यक्तींना दुखावत नाहीत. सर्वांना सोबत घेण्याचा आणि सर्वांना न्याय देण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.माणूस पण जपण्यासाठी शैलेश पाटील प्राधान्य देतात असं गायकवाड आवर्जून सांगतात!



दरवर्षी वारीमध्ये महिनाभर ॲम्ब्युलन्स सेवा!

जननायक शैलेश मनोहर पाटील

वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

सामाजिक उपक्रम
- नियमित मोफत आरोग्य शिबिरे
- जेष्ठ नागरिकांसाठी नेत्र तपासणी
- महिलांसाठी स्वयंरोजगार
- गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत
- दरवर्षी 5 हजार विद्यार्थ्यांना वह्या वाटप
- नागरिकांना देवदर्शन
- तरुणांसाठी रोजगार मेळावे

- गणेश पाटील,समाजसेवक





दिशादर्शक, मार्गदर्शक!
# दिवा न्यूज
सोमवार, दि. २१ ऑगस्ट २०२३
पान : ८
www.diwanews.com

श्री सेवक...लोकसेवक!
शैलेश मनोहर पाटील



## कार्यकर्त्यांसाठी विमा संरक्षण योजना राबवण्याचा संकल्प

**1** राजकारण व समाजकारण करताना आपल्या सोबत सामाजिक कार्यात... जनसेवेत कायम सोबत असणाऱ्या सर्वसामान्य कुटुंबाची काळजी घेण्याच्या दृष्टीने शैलेश पाटील यांनी अनोखा उपक्रम राबवण्यास सुरुवात केली आहे. त्यांचा हा उपक्रम कौतुक करण्याजोगा आहे.

**2** सर्व सामान्य कुटुंबातून आलेले व समाजकार्याची तळमळ असणारे आपले पदाधिकारी यांच्या कुटुंबाची काळजी घेतली जावी या उद्देशाने प्रत्येक पदाधिकाऱ्याचा एक लाखाचा विमा मोफत काढून देण्याचा संकल्प शैलेश पाटील यांनी हाती घेतला आहे.

**3** या अनोख्या उपक्रमातून शहरातील सर्वच सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्यांना विमा संरक्षण मिळवून देण्याचा त्यांचा प्रामाणिक प्रयत्न आहे.

**4** आपल्या सोबत असणाऱ्या कार्यकर्त्याचं कुटुंब सुरक्षित असावं,त्याला विम्याचे संरक्षण मिळावं... या उदात्त हेतूने राजकारणा पलीकडे आपल्या जिवाभावाच्या लोकांना जपण्याचा त्यांचा हा उपक्रम दखल घेण्या जोगा आहे.खरंतर अशा उपक्रमांची दखल अन्य राजकारण्यानी घ्यायला हवी!




**5** स्वत: चा कार्यकर्ता पदाधिकारी सुरक्षित रहावा यासाठी हा उपक्रम असून या उपक्रमामुळे शैलेश पाटील यांचा राजकारणापलीकडील सामाजिक चेहरा पाहायला मिळतो!



## दरवर्षी ५ हजार विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे मोफत वाटप हा दिव्यातील अनोखा विक्रम








दिव्याच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये शैलेश पाटील यांनी अनेक विद्यार्थ्यांना अडचणीच्या वेळी सहकार्य केले आहे...करत आहेत. अनेकांचे मोफत ॲडमिशन शैलेश पाटील करतात.तर अनेकांची वार्षिक फी देखील ते भरत असतात. हे करत असताना दरवर्षी २० ऑगस्ट रोजी किमान ५००० विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्य वाटप करण्याचा त्यांचा उपक्रम विशेष लक्ष वेधून घेतो. दिवा शहरातील पाच हजार विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रत्येकी सहा वह्या शैलेश पाटील मोफत देत असतात. यामुळे गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा लाभ मिळतो.चांगल्या दर्जाचं शैक्षणिक साहित्य शैलेश पाटील यांच्याकडून दिवा शहरातील विद्यार्थ्यांना दिलं जातं. संपूर्ण शहरातून यासाठी विद्यार्थी दरवर्षी २० ऑगस्टला शैलेश पाटील यांच्या कार्यालयात गर्दी करतात.या शैक्षणिक साहित्याच्या वाटपावेळी प्रभागातील विद्यार्थ्या व्यतिरिक्त संपूर्ण शहरातील विद्यार्थ्यांना हे शैक्षणिक साहित्य वाटप केले जातं हे विशेष आहे! मदत करताना शैलेश पाटील हे आपला मतदारसंघ किंवा मतदार या गोष्टी न पाहता सर्वसामान्य नागरिकांना मदत करण्याच्या दृष्टीने सहकार्य करत असतात.यातून त्यांचा मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो!

**संजय भगत,** सामाजिक कार्यकर्ते